\\10.158.17.107\c\dc backup-30-05-2014\MHP-DC\DGP Appointment-2015\मुलाखतीचे पत्र.doc inward 820530/15

# जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली (उपचिटणीस शाखा)

पत्ता-राजवाडा आवार,सांगली, **दुरध्वनी क्र**-0233-2373063, **Email ID**- **dcbranchsangli@gmail.com**

क्रमांक-गृह-1/कार्या-6/एमएजी-1/1453/2015

दिनांक 28/05/2015

## आदेश

2/- जिल्हा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता, तसेच सहाय्यक सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता, पदांसाठी सन 2015 मध्ये दिनांक 17/03/2015 ते 31/03/2005 या काळात अर्ज मागविणेत आले. त्यानंतर सध्या कार्यरत असलेल्या सहाय्यक सरकारी वकीलांसाठी वयाची अट 55 वर्षावरून 62 वर्षापर्यत शिथिल करणेत आली व दि.15/04/2015 अखेर अर्ज दाखल करणेस मुदत वाढ देण्यात आली. वरील वाढीव कालावधीसह विहीत केलेल्या मुदतीत जिल्हा सरकारी वकील व सहायक सरकारी वकील पदासाठी एकुण 172 अर्ज प्राप्त झाले.

3/- प्राप्त अर्जांमध्ये काही अर्जदारांनी करपात्र उत्पन्नाचा रकाना कोरा ठेवला आहे. काही अर्जदारांनी No. Not applicable असे नमुद केलेले आहे. अर्जांचे छानणीमध्ये अर्जास आवश्यक (mandatory) बाबींचा छानणीवेळी विशेषतः विचार करणेत आला. सर्व अर्जाची रितसर छानणी करून दिनांक 25/05/2015 रोजी पात्र-अपात्र उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. मूळ अर्जात नमूद केलेले अत्यंत आवश्यक व पर्यायी मुद्दे ठरविणेत आले. त्यामध्ये तीन वर्षाचे आयकर विवरण पत्र जोडणे अनिवार्य आहे, अशी अर्जातच स्पष्ट अट होती. त्यामुळे प्राप्त अर्जापैकी जिल्हा सरकारी वकील व सहायक सरकारी वकील या पदासाठीचे एकूण 61 अर्जदार अपात्र ठविणेत आले.

4/- दिनांक 26/05/2015 व 27/05/2015 रोजी अपात्र यादीतील एकूण 11 अर्जदारांनी आमचे अर्जाचा फेर विचार व्हावा व तांत्रीक मुद्यावर अर्ज फेटाळू नयेत अशी विनंती केली. प्रस्तुत अर्जादार यांचे अर्जाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | अर्जदाराचे नांव | विनंतीचे कारण |
|---|---|---|
| 1 | दिपा बाळासाहेब कुरणे | सन 2012-2013 चे उत्पन्न कर पात्र नसलेमुळे जोडलेले नाहीत. |
| 2 | राजेंद्र उपेंद्र कुभांरे | माझ्या उत्पन्नाबाबत कोणतेही कथन नमुद करणेचे राहुन गेले आहे. माझे वार्षीक उत्पन्न रू. 1, 80, 000/- ते 2,00,000/- पर्यत आहे. सदर उत्पन्न करपात्र नाही त्यामुळे उत्पन्नाचा कर भरलेला नाही असे कळविले आहे. |
| 3 | पाटील विनायक अण्णासाहेब | मी इनकम टॅक्स रिटर्न देणेस तयार असलेचे कळविले आहे. |

5/- वरील सर्व अर्जाचा विचार करून व अद्याप मुलाखती संपलेल्या नसल्यामुळे अर्जदार यांना तांत्रिक दृष्टया डावलणेत येऊ नये. त्यास संधी देण्यात यावी व नैसर्गिक न्याय तत्वाचा अंमल व्हावा या उद्देशाने वरील नमूद सर्व अर्जदारास मुलाखतीची संधी देण्यात यावी या निर्णयाप्रत मी आलो आहे. म्हणुन मी जिल्हाधिकारी सांगली खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

वरील सर्व अर्ज मान्य करण्यात येत आहेत व वर नमूद अर्जदार क्र. 1 ते 11 यांचे अर्ज त्यांनी अर्ज केलेल्या पदाकरीता पात्र ठरविणेत येत आहेत. त्यांना दिनांक 28/05/2015 रोजी सोयीच्या वेळी इतर मुलाखती बरोबरच संधी देण्यात यावी.

**ठिकाण** - सांगली

**दिनांक व वेळ** -28/05/2015, **सकाळी** -10.30

DISTRICT MAGISTRATE जिल्हाधिकारी सांगली SANGLI.

**जिल्हाधिकारी सांगली**